# पोलिसांमधील माणूस

पोलिसांमधील माणूस

महाराष्ट्र टाइम्स – दि. ०४ जुलै, २०१९

# ...आणि जीव भांड्यात पडला

## पोलिस कर्मचाऱ्यामुळे सापडली ज्येष्ठाची पैशांची पिशवी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शहरात धो-धो पाऊस सुरू असतानाच पर्वती परिसरातील एका ज्येष्ठ नागरिकाच्या पत्नीच्या पोटात अचानक दुखू लागले. तिला रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे पैसे नव्हते. त्यामुळे त्यांनी पत्नीला रिक्षाने रुग्णालयात पाठविले. त्यानंतर नातेवाइकांशी संपर्क साधून, दहा हजार रुपये गोळा केले. एका पिशवीत पैसे ठेवून दुचाकीवरून ते रुग्णालयात पोहोचले; पण रुग्णालयात पैसे भरताना पिशवीच हरवल्याचे लक्षात आले अन् त्यांच्या पायाखालची वाळू सरकली. त्यांनी परतून त्याच रस्त्याने पैशांची पिशवी शोधण्याचा प्रयत्न सुरू केला. तेवढ्यात त्यांना दत्तवाडी पोलिस ठाण्यातून पैशांची पिशवी सापडल्याचा फोन आला आणि त्यांचा जीव भांड्यात पडला.



> वाहतुकीचे नियोजन करत असताना रस्त्यावर एक पिशवी पडलेली दिसली. ती पिशवी हातात घेऊन पाहिल्यानंतर त्यामध्ये रोख रक्कम, मोबाइल फोन, पासबुक, बँक एटीएम कार्ड व राजाराम संत यांचे ओळखपत्र दिसले. त्यानंतर त्यांना फोन करून माहिती दिली आणि पैशांची पिशवी त्यांच्याकडे सुपूर्द केली.
>
> – नवनाथ भोसले, पोलिस नाईक, दत्तवाडी पोलिस ठाणे

### अशी घडली घटना

- पर्वती परिसरातील राजाराम संत यांच्या पत्नीच्या पोटात अचानक दुखू लागले.
- त्यांनी पत्नीला रिक्षाने रुग्णालयात पाठविले आणि स्वतः पैशांची जुळवाजुळव करून नंतर दुचाकीवरून रुग्णालयात गेले.
- रस्त्यात त्यांची पैशांची पिशवी पडली. हे समजताच संत हतबल झाले.
- त्याही परिस्थितीत, मुसळधार पावसात ते पिशवी सोडण्यासाठी बाहेर पडले. तेवढ्यात पोलिसांनी त्यांना पिशवी सापडल्याचा फोन केला.

पर्वती परिसरात पत्नीसोबत राहणारे राजाराम दत्तात्रय संत (वय ६०) खडकी ॲम्युनिशन फॅक्टरीमधून सेवानिवृत्त झाले आहेत. एक जुलै रोजी शहरात जोरदार पाऊस पडत असताना संत यांच्या पत्नीच्या पोटात दुखू लागले. त्रास असह्य झाल्याने त्यांनी पत्नीला रुग्णालयात दाखल करायचे ठरविले. ते पेन्शनवर उदरनिर्वाह करतात. पैसे नसल्यामुळे त्यांनी अगोदर रिक्षातून पत्नीला एका नातेवाइकासोबत दीनानाथ रुग्णालयात पाठविले. त्यानंतर इतर नातेवाइकांना फोन करून दहा हजार रुपये जमवले. पैसे मिळाल्यानंतर भर पावसात दुचाकीवरून पैसे व इतर साहित्य घेऊन ते रुग्णालयात पोहोचले. तोपर्यंत त्यांच्या पत्नीवर उपचार सुरू झाले होते. रुग्णालय प्रशासनाने त्यांना पैसे भरायला सांगितले. त्यामुळे ते रुग्णालयाच्या काउंटरवर पैसे भरण्यासाठी गेले. त्या वेळी त्यांना पैशांची पिशवी हरवल्याचे लक्षात आले. काय करावे, हे त्यांना सुचेना. तरीदेखील त्यांनी आलेल्या मार्गावरून पैशांची बॅग शोधण्याचा प्रयत्न सुरू केला. तेवढ्यात त्यांना दत्तवाडी पोलिस ठाण्यातून पैशांची पिशवी सापडल्याचा फोन आला. दत्तवाडी पोलिस ठाण्याचे कर्मचारी नवनाथ भोसले यांना ही पिशवी सापडली होती. त्यांनी तत्काळ फोन करून संत यांना पिशवी परत केली. संत यांनी पोलिसांचे आभार मानले.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ०४ जुलै, २०१९



# घर सोडून गेलेल्या मुलीचा असा लागला शोध

म. टा. प्रतिनिधी, पुणे

आई रागावली म्हणून तिसरीत शिकणारी मुलगी घराबाहेर पडली. अंधार पडल्याने घरी परतायचा रस्ता विसरली. बस स्टॉपवर थांबलेल्या एका तरुणीला ती भेटली. तरुणी त्या मुलीला घेऊन स्वतःच्या घरी गेली. दुसरीकडे मुलगी हरवल्याने तिच्या कुटुंबीयांनी पोलिस ठाणे गाठले. २५ पोलिसांच्या पथकाने मुलीचा रात्रभर शोध घेतला; तरी ती सापडली नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी तरुणी आणि तिचा पती त्या मुलीला पोलिस ठाण्यात नेत होते. त्या वेळी मुलीला आपली शाळा दिसली. ती मुलीने ओळखली. पुढे पोलिसांच्या मदतीने मुलीची भेट होताच पालकांनी सुटकेचा निश्वास टाकला. पिंपळेनिलख ते हिंजवडी या भागात नुकताच हा प्रकार घडला.

अवनी (नाव बदलले आहे) ही आठ वर्षांची मुलगी पिंपळेनिलख येथे आई-वडील व नऊ वर्षांच्या बहिणीसह राहते. अवनी व तिची बहिण येथील बाणेर हायस्कूलमध्ये शिकतात. मंगळवारी जेवण आणि अभ्यासावरून अवनीला आई रागावली होती. त्यानंतर नोकरीसाठी तिचे आई-वडील घराबाहेर पडले. अवनीला त्याचा राग आला आणि ती चिठ्ठी लिहून ती घराबाहेर पडली. चालत-चालत रक्षक चौकात आली. पंधरा मिनिटे ती या परिसरात घुटमळली. मात्र, अंधार पडल्याने तिला घरचा रस्ता लक्षात येत नव्हता. ती तेथील बीआरटी बस स्टॉपवर येऊन थांबली. या वेळी एक १९ वर्षीय तरुणी हिंजवडीला जाण्यासाठी तिथे उभी होती. अवनीने तिला आपली कहाणी सांगितली. तसेच, 'मला तुमच्या बरोबर घेऊन चला,' असेही म्हणाली. घरी परतण्याच्या गडबडीत ती तरुणी अवनीला घेऊन घरी गेली.



> अवनी घरात नसल्याचे समजल्याने पायाखालची जमीनच सरकली होती. सर्वत्र तिचा शोध सुरू होता. सांगवी पोलिसांनी खूप मदत केली; पण ती कुठेच सापडली नाही. त्यामुळे सकाळी आम्ही तिला शोधण्यासाठी पुन्हा निघणार होतो. मात्र, त्याच वेळी या दाम्पत्याने तिला शाळेत सोडले. त्या तरुणीने तिचा केलेला सांभाळ पाहता, लगेच पोलिसांना का कळविले नाही, असा प्रश्न विचारण्यास आम्ही धजावलो नाही. आम्ही त्यांचे जन्मभर ऋणी राहू.
>
> \- अवनीची आई

दुसरीकडे अवनीची आई साडेसहा वाजता घरी आली. तर, तिला अवनी घरात नसल्याचे समजले. अवनीच्या कुटुंबीयांनी सांगवी पोलिस ठाण्यात धाव घेतली. प्रभारी वरिष्ठ निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांनी सहायक निरीक्षक गणेश खारगे, फौजदार श्रीकांत पाटील, यशवंत साळुंखे आणि २० कर्मचाऱ्यांच्या चार पथकांना अवनीच्या शोधार्थ शहरभर पाठवले. घर ते बसस्थानक, हाय-वे, नदीपात्राकडील रस्ता, मोकळे पटांगण यासह शाळेकडे जाणारा रस्ता असा सर्व परिसर पोलिसांकडून पिंजून काढण्यात आला. यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे, खबऱ्यांचे जाळे, तांत्रिक माहितीचा आधार घेतला जात होता. पोलिसांच्या टीममध्ये नितीन खोपकर यासाठी विशेष प्रयत्न करीत होते. मात्र, पहाटेपर्यंत अवनीचा काहीच पत्ता लागला नाही.

दरम्यान, अवनीला घरी नेल्यानंतर तरुणीने तिच्याकडे विचारपूस केली. मात्र अवनीला पूर्ण नाव, पत्ता, फोन नंबर काहीच सांगता येत नव्हते. रात्री पती आल्यानंतर तरुणीने त्याला सर्व प्रकार सांगितला. दुसऱ्या दिवशी दोघे अवनीला घेऊन बाणेरमार्गे सांगवी पोलिस ठाण्याकडे निघाले. तेव्हा रस्त्यात शाळा दिसताच अवनीने 'हीच माझी शाळा' असे सांगितले. त्यामुळे अवनीला घेऊन दाम्पत्य शाळेत गेले. मुख्याध्यापिकांनी अवनीच्या कुटुंबीयांना बोलावून घेतले. त्यानंतर रात्रभर अवनीचा सांभाळ करणारे दाम्पत्य, अवनी व तिचे आई-वडील सांगवी पोलिस ठाण्यात गेले. सांगवी पोलिसांनी कायदेशीर सोपस्कार करून अवनीला कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. अवनीला रात्रभर सांभाळणाऱ्या या दाम्पत्याचे आभार मानताना पालकांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले होते.

लोकमत – दि. २१ जुलै, २०१९

# पोलिसाच्या पर्सवरच मारला डल्ला प्रसंगावधान राखून रंगेहाथ पकडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**विमाननगर :** पीएमपी बसमध्ये महिलांची पर्स लांबवणाऱ्या तीन महिलांना महिला पोलिसाने प्रसंगावधान राखून पकडले. याप्रकरणी पूजा धर्मा गाज (वय २०), श्वेता राजेश गाज (वय २०) व सपना ऊर्फ डेविड गाज (वय २५, तिघीही रा. सर्वोदय कॉलनी मुंढवा) यांना अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या तिघी चक्क महिला पोलिसाचीच पर्स लांबवण्याचा प्रयत्न करत असताना पोलीस नाईक नलिनी सावंत यांनी त्यांना प्रसंगावधान राखून रंगेहाथ पकडले.



◆ पोलिस नाईक नलिनी सावंत या सध्या पोलीस मुख्यालय येथे काम करत असून त्यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानाने पीएमपी बसमध्ये चोऱ्या करणाऱ्या तीन महिलांना रंगेहाथ पकडता आले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांनी पोलीस नाईक नलिनी सावंत यांचे कौतुक व अभिनंदन केले. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक संदीप यादव करीत आहेत.

पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि. १८) महिला पोलिस नाईक नलिनी सावंत या दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास मनपा लोहगाव बसने प्रवास करत होत्या. बसमधील तीन महिला कडेवर लहान मुले घेऊन उभ्या होत्या. कडेवरील मुलाला इकडे तिकडे करीत त्यांनी नाईक यांच्या पर्समध्ये हात घालण्याचा प्रयत्न केला.

याच वेळी दुसऱ्या एक महिलेच्या पर्समधील वस्तू काढल्याचे लक्षात आले. काही क्षणातच त्या बसमधून उतरण्याची घाई करु लागल्या. पोलीस नाईक नलिनी सावंत यांनी तत्काळ प्रसंगावधान राखून बसच्या दारात या तिनही महिलांना अडवून बस विश्रांतवाडी पोलीस ठाणे येथे घेऊन आल्या. अधिक तपासात या तीनही महिलांनी पोलीस नाईक सावंत यांच्या पर्समधील रोख दोन हजार रुपये व सुनीता वाघमारे यांच्या पर्समधील रोख रक्कम व चांदीचे पैंजण असा तेरा हजार रु. किमतीचा मुद्देमाल चोरी केल्याचे कबूल केले.

## धडाकेबाज कारवाई : सर्व स्तरांतून होत आहे स्वागत

# पोलिसांच्या सतर्कतेमुळे वाचले युवकाचे प्राण

लोकमत न्यूज नेटवर्क

कर्वेनगर : कर्वेनगर येथे काल रात्री पावणेदोन वाजता तोडमल (वय ३०) हा तरुण घरात आत्महत्या करत होता. ही घटना पोलिसांना समजताच तातडीने घटनास्थळी दाखल होत पोलीस कॉन्स्टेबल प्रतीक मोरे आणि देवा धोंगडे यांनी दरवाजा तोडून तरुणाला दोरीवरुन सोडवून जवळील हॉस्पिटलमध्ये दाखल केले. या सतर्कतेमुळे तरुणाचे प्राण वाचले आहे.

वारजे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश खांडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या तरुणाची आई रात्री पावणेदोन वाजता चौकीत धावत आली आणि माझा मुलगा आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत आहे, असे तिने सांगितले.



प्रतीक मोरे



देवा धोंगडे

गस्तीवर असणारे पोलीस प्रतीक मोरे, देवा धोंगडे, महेश भोयणे, स. पो. शेखर फाटक यांनी घटनास्थळी दाखल होत आतून कडी असलेला दरवाजा तोडून दोरी कापून तरुणाची सोडवणूक केली आहे. तसेच तातडीने जवळील हॉस्पिटलमध्ये दाखल करीत तरुणाचे प्राण वाचवले आहे. या पोलिसांची सतर्कता आणि तातडीने घटनास्थळी दाखल होत वाचलेल्या तरुणाच्या परिवाराने पोलिसांचे आभार मानले आहेत. यामुळे कर्वेनगरमध्ये या पोलिसांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश खांडेकर करत आहेत.

लोकमत – दि. २१ जुलै, २०१९

# हरवलेल्या ज्येष्ठाला पोलिसांनी केली मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**सहकारनगर :** वेळ सायंकाळची ७ वाजल्याची, संपूर्ण पुणे शहरात धो धो पाऊस पडतो आहे. आणि अशा वातावरणात दत्तवाडी मार्शल सिंहगड रोडला एका महिलेला मदत पाहिजे आहे, त्यांनी त्या हॉटेल सुमधूचा पत्ता दिला. त्यावर दत्तवाडी बिट मार्शल वरील पोलीस कॉन्स्टेबल दिलीप पिलाने व गणेश शिंदे या दोघांनी भर पावसात दिलेल्या पत्त्यावर जाऊन पाहणी केली असता, एका वकील महिलेने एक ज्येष्ठ नागरिक रस्त्याच्या कडेला चिखलात पडलेले पाहिले. म्हणून पोलीस नियंत्रण कक्ष येथे माहिती कळवली होती.

त्या ज्येष्ठ नागरिकांची जाऊन चौकशी केली असता त्यांनी आपले नाव केशव ब्रम्हेकर असे सांगितले. त्यांचे वय अंदाजे ६५ वर्षे असल्याचे जाणवत होते. त्यांना स्वतःचा पूर्ण पत्ता सांगता येत नव्हता. त्या मुळे त्यांना घरी कुठे सोडायचे हा प्रश्न होता. त्यांना वेगवेगळ्या तऱ्हेने माहिती विचारली असता आपल्या मुलाचे नाव त्यांनी प्रशांत ब्रम्हेकर असे सांगितले.

## माणुसकीची जाणीव



◆ लोक त्यांना ओळखतील म्हणून त्यांनी विठ्ठलवाडी मंदिर परिसर व ज्या भागात ज्येष्ठ नागरिकांची ऊठबस आहे अशा ठिकाणी त्यांच्या सोबत जाऊन विचारपूस केली असता, विठ्ठलवाडी सिंहगड रोड परिसरात संतोष हॉलच्या परिसरात प्रशांत ब्रह्मेकर यांचा पत्ता मिळाला व त्यांनीसुद्धा आपले वडील हरवले, शोधाशोध चालवली होती. माणुसकीची जाणीव ठेवून या दोन पोलीस कॉन्स्टेबल यांनी आपले कर्तव्य पार पाडले आहे.

# अल्पवयीन मुलीची नराधमाच्या तावडीतून सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सायंकाळची वेळ, शिवाजी रस्ता वाहनांनी भरून वाहत होता. त्याच गर्दीत एका रिक्षातून निवृत्त पोलीस अधिकारी चालले होते. त्यांचे लक्ष चौकातून जात असलेल्या एका १७ वर्षांच्या मुलीकडे गेले. ती घाबरलेली दिसत होती. तिच्या मागोमाग एक वयस्कर पुरुष जाताना दिसत होता. रिक्षातून जात असलेल्या या अधिकाऱ्याला काहीतरी गडबड असल्याचे जाणवले.

रिक्षा पुढे गेली तरी, त्यांनी मागे वळून पाहिले तर ती मुलगी व तो पुरुष पुन्हा उलटे फिरले. त्यांनी आपली शंका रिक्षाचालकाला बोलून दाखविली व ते बुधवार चौकात उतरले. तोपर्यंत ती मुलगी व तो पुरुष अप्पा बळवंत चौकाकडे गेले व काही वेळाने पुन्हा बुधवार चौकातून पासोड्या विठोबा मंदिराकडे गेले. या अधिकाऱ्यांच्या मनातील शंकेची जागा संशयाने घेतली. त्यांनी चौकातील वाहतूक पोलिसाला बरोबर घेऊन त्यांना मंदिरापाशी गाठले. त्या मुलीकडे विचारणा केल्यावर तिला फसवून इथं आणले असल्याचे लक्षात आले. त्यांनी दोघांना फरासखाना पोलिसांच्या स्वाधीन केले. या अधिकाऱ्याच्या चाणाक्ष नजरेमुळे एक अल्पवयीन मुलीची नराधमाच्या तावडीतून सुटका करण्यात पोलिसांना यश आले.

फरासखाना पोलिसांनी हरी कन्हैया बिजावत (वय ७२, रा. हडपसर) याला अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन तिच्याशी लैंगिक चाळे केल्याच्या आरोपावरुन अटक केली.

शरद ओगले यांनी विश्रामबाग विभागाचे सहायक पोलीस आयुक्त म्हणून काम पाहिले असल्याने ते येथील परिस्थितीशी चांगले परिचित आहेत. निवृत्तीनंतर ते काही कामासाठी फरासखाना वाहतूक विभागात येत होते. त्यांना ती मुलगी घाबरलेली दिसल्याने त्यांनी दोघांना पोलिसांच्या हवाली केले.

बिजावत याला अटक करुन पुढील तपासासाठी पुणे लोहमार्ग पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे.

> रिक्षातून जात असताना आपल्याला ही मुलगी घाबरलेली असल्याचे जाणवले. तिच्या मागेमागे जाणाऱ्या माणसाविषयी संशय आल्याने बुधवार चौकातील वाहतूक पोलिसाला बरोबर घेऊन विठ्ठल मंदिराजवळ त्या मुलीकडे चौकशी केली. तेव्हा तो तिला पुणे स्टेशनवरुन घेऊन आल्याचे तिने सांगितले. त्यानंतर अधिक चौकशीसाठी त्यांना फरासखाना पोलिसांच्या हवाली केले.
>
> **- शरद ओगले,**
> सहायक पोलीस आयुक्त, निवृत्त

लोकमत – दि. ८ जुलै, २०१९

# शाळेतून येताना वाट चुकली अन् पोलिसांनी तिला सोडले घरी

**पुणे :** साईनाथनगर या एवढ्या पत्त्यावरून घराची वाट चुकलेल्या ७ वर्षांच्या मुलीला पोलिसांनी तिच्या घराचा तासाभरात शोध घेऊन आई-वडिलांच्या स्वाधीन केले.

चंदननगर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत शिवराणा पोलीस चौकीच्या मार्शलला एक ७ वर्षांची मुलगी जुना मुंढवा रोडवर एकटीच रडत असताना दिसली. पोलीस कर्मचारी अप्पाराव कापसे व अशोक हावळे यांनी तिच्याकडे जाऊन विचारणा केली. त्यावेळी त्या मुलीने तिचे नाव अंकिता सिद्धार्थ गायकवाड असे सांगितले. ती लोणकर विद्यालयात दुसरीच्या वर्गात शिकत असून शाळा सुटल्यानंतर नेहमीच्या बसमध्ये जाण्याऐवजी दुसऱ्याच बसमध्ये बसली आणि या ठिकाणी पोहोचली. यावेळी ती घराचा रस्ता चुकल्यामुळे घाबरून रडत बसली होती. पोलिसांनी तिला घराचा पत्ता विचारल्यानंतर तिने फक्त साईनाथनगर असा सांगितला होता.

त्यामुळे तिच्या घरच्यांना शोधण्याचे पोलिसांसमोर आव्हानच उभे राहिले. केवळ साईनाथनगर सांगितल्यावरुन दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांनी मुलीला घेऊन संपूर्ण साईनाथनगरच फिरवले. यावेळी दुपारी दीडच्या सुमारास तिच्या घराचा पत्ता पोलिसांना सापडला. इकडे तिचे आई-वडीलदेखील मुलगी अजून घरी कशी आली नाही, म्हणून शोध घेत होते. मात्र अचानक मुलगी घरी सुखरूप आल्याचे पाहून दोघांनाही आनंद झाला.

---

Pune Times Mirror - 27 July, 2019

# Girl who ran away from home finds safe haven in Yerwada PS

## 10-yr-old was spotted by a traffic cop near a paan shop

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEETS @gunwantimirror

In an intriguing case of bond between the city police and a 10-year-old girl rescued by city police, the minor has expressed her wish to stay with the cops in the police station rather than being reunited with her family or the NGO where she resided for a few years. "I want to stay in the police station as I feel safer here." The minor has allegedly fled her home as she did not feel cared for by her mother and stepfather. The girl has alleged that her mother, who separated from her biological father, always beat her up and tortured her, due to which she has refused to go back to her family. The minor further stated that the cops at the Yerwada police station, where she was brought to after being spotted sitting aimlessly next to a paan shop, gave her attention and care, which she lacked at her home. However, due to practical constraints, Yerwada police handed over the girl to an NGO, SOS Balgram, where she will be taken care of properly, they feel.

Identified as Poonam Arjun Pawar, the girl was spotted by traffic cop Vilash Kokane near Bishop's School Chowk, Ramwadi, where she was sitting on a vada pav push cart. Kokane had come there for tea. That is when he observed that the girl was sitting there cluelessly. On enquiring about the girl to other shopkeepers, he didn't receive any satisfactory answers. Then he turned to the girl and asked her of her whereabouts. To this, Poonam gave vague replies. First she said that she hails from Solapur and said that she forgot exactly where her mother resided, adding that she was waiting there to go back to Solapur. Kokane, who is attached to Yerwada traffic department, decided to hand over the girl to Yerwada police. Talking about the incident, Kokane told *Mirror*, "I found Poonam on July 25 around 8 pm. When I asked her about her parents, she told me that her father lives in Solapur, while her mother lives in Pune, adding that she wasn't sure of her mother's address. She even told me that she was studying in Class IV in Solapur and that she came to Pune with her mother after a while."



Poonam with her rescuers

API Balabhim Nanaware told *Mirror*, "We asked for her whereabouts from Solapur police and found out about the girl's parents. We got to know that she was staying at an NGO in Solapur for about four years. When we contacted the NGO, Nirkshan Grah Balsudhargrah, they told us that between October 28, 2016, and April 5, 2019, she stayed with them. She received education there for a while. Later, the girl's mother took her home with her."

Nanaware further said, "We are investigating the case further and looking for her parents," adding that Poonam also said that her mother and stepfather made her do household work and hence she did not want to go back to them.

प्रभात – दि. १६ जुलै, २०१९

# नदीपात्रात पडलेल्या तरुणाला पोलिसांच्या तत्परतेने जीवदान

## हद्दीचा वाद विसरून 'कर्तव्य'

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १५ - रेल्वेपुलावरुन पळताना तोल गेल्याने तरुण नदीपात्रात पडून जखमी झाला. ही घटना कामगार पुतळ्याजवळ घडली. शिवाजीनगर पोलिसांनी हद्दीचा वाद न घालता तरुणाचे प्राण वाचविण्यास प्राधान्य दिले.

युवराज सावंत (वय २२, रा. नरपतगिरी चौक) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. रेल्वेपुलाजवळील मोकळ्या जागेत शनिवारी रात्री साडेबारा वाजता युवराजचे मित्र बसले होते. त्यांच्याकडे पळत जाताना युवराजचा तोल गेल्याने तो रेल्वे पुलावरुन खाली नदीपात्रामध्ये कोसळला. नदीपात्रातील कठड्यावर पडल्याने त्यास गंभीर दुखापत झाली. याबाबतची माहिती रात्रगस्तीवर असलेल्या शिवाजीनगरचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब कोपनर यांना मिळाली. त्यानंतर ते घटनास्थळी दाखल झाले. त्यापूर्वी त्यांनी जीवरक्षक राजेश काची, अग्निशमन दलास माहिती दिली. काची यांनी मध्यरात्री नदीत उतरुन युवराजला पाहिले. त्यावेळी तो गंभीर जखमी होता, अग्निशमन दलाने जाळी सोडून युवराजला अलगदपणे उचलून पुलावर आणले.

"ही घटना खडकी हद्दीतील आहे. परंतु हद्दीचा प्रश्न बाजूला ठेवत प्राण वाचविण्यास प्राधान्य दिले. सोबत पोलिसांसह जीवरक्षक राजेश काची यांना बोलावून अग्निशमन दलाच्या मदतीने तरुणाचे प्राण वाचविले. रुग्णवाहिका वेळेवर न आल्याने तरुणास रिक्षातून ससून रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर हे प्रकरण खडकी पोलिसांकडे देण्यात आले.

– **बाळासाहेब कोपनर,**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक.

# पोलिसी नजरेने केली तिची सुटका

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १६ - पोलिसांची नजर निवृत्त झाल्यानंतरही मरत नाही, याचेच एक ज्वलंत उदाहरण नुकतेच प्रत्ययास आले. एका निवृत्त सहायक पोलीस आयुक्ताने निराधार अल्पवयीन मुलीला एका नराधमाच्या तावडीतून सोडवले. संबंधित आरोपीने मुलीला फसवून आणले होते. आरोपीने तिच्याशी अश्लील चाळे करून तिला जबरदस्तीने घरी नेण्याचा प्रयत्न करत होता. ही मुलगी भेदरलेल्या अवस्थेत रस्त्याने चालली असताना संबंधित निवृत्त सहायक पोलीस आयुक्ताच्या नजरेस पडली. त्यांनी वेळीच धाव घेत तिला मदत केली तर आरोपीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

फरासखाना पोलिसांनी हरी कन्हैया बिजावत (७२, रा हडपसर) याला अटक केली आहे. शरद ओगले (सहायक पोलीस आयुक्त, निवृत्त) हे काही कामानिमित्त सायंकाळी शिवाजी रस्त्याने रिक्षातून चालले होते. त्यांचे लक्ष चौकातून जात असलेल्या एका १७ वर्षांच्या भेदरलेल्या मुलींकडे गेले. त्यांना तिच्या मागोमाग एक वयस्कर पुरुष जाताना दिसत होता. त्यांच्या पोलिसी नजरेने काहीतरी गडबड असल्याचे ओळखले. रिक्षा पुढे गेली तरी, त्यांनी मागे वळून पाहिले. ते बघत असल्याचे पाहून ती मुलगी व तो पुरुष पुन्हा उलटे फिरले. त्यांनी आपली शंका रिक्षाचालकाला बोलून दाखविली व ते बुधवार चौकात उतरले. तोपर्यंत ती मुलगी व तो पुरुष अप्पा बळवंत चौकाकडे गेले व काही वेळाने पुन्हा बुधवार चौकातून पासोड्या विठोबा मंदिराकडे गेले. यामुळे त्यांच्या मनातील शंकेची जागा संशयाने घेतली. त्यांनी चौकातील वाहतूक पोलिसाला बरोबर घेऊन त्यांचा पाठलाग केला. मुलीला व ज्येष्ठाला मंदिरापाशी गाठले. त्या मुलीकडे विचारणा केल्यावर तिला फसवून इथं आणले असल्याचे लक्षात आले. त्यांनी दोघांना फरासखाना पोलिसांच्या स्वाधीन केले.

फरासखाना पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर नावंदे यांनी सांगितले, ती रेल्वे तिकीट खिडकीपाशी थांबली असताना बिजावत याने तिला हेरले व तिच्याशी गोड बोलून 'तुझ्या अंगावरचे कपडे खराब झाले आहेत. चल तुला नवीन कपडे घेऊन देतो', असे सांगून तिला रिक्षाने शिवाजी रोडवर आणले. रिक्षात त्याने तिच्याशी लगट करायचा प्रयत्न केल्याने ती घाबरली व 'मला जाऊ द्या' असे म्हणू लागली. तरी तो तिच्या मागे मागे जाऊन 'तू माझ्या घरी रहा' असे सांगू लागला. त्यांना ओगले यांनी पासोड्या विठोबा मंदिरापासून पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

सकाळ – दि. ५ जुलै, २०१९

# पोलिसांमुळे मिळाली हरवलेली बॅग

## पत्नी रुग्णालयात असताना मदत मिळाल्याने ज्येष्ठाला दिलासा

**पुणे, ता. ४ :** बाहेर पाऊस सुरू असताना ज्येष्ठ नागरिकाच्या पत्नीची प्रकृती रात्री अचानक बिघडली. त्यांना रुग्णालयात दाखल करून उपचार सुरू होताच पैसे भरा, असे फर्मान रुग्णालयाकडून आले.

पैसे भरायला हे ज्येष्ठ काउंटरवर जातात, पण पैशांची बॅग हरवल्याचे त्यांच्या लक्षात येते. आधीच टेंशन असताना उसने आणलेले पैसे हरवल्याने ज्येष्ठ नागरिक चांगलेच पेचात पडतात. रुग्णालयाकडे ज्या रस्त्याने आले त्या रस्त्याने भरपावसात बॅग शोधत निघतात. तेवढ्यात तुमची बॅग सापडली आहे, पोलिस ठाण्यात येऊन जा, असा पोलिसांचा फोन येतो. हे ऐकताच त्यांच्या जीवात जीव येतो.

राजाराम दत्तात्रय संत (वय ६०) यांच्यासोबत हा घडलेला प्रसंग. संत हे खडकीतील ॲम्युनिशन फॅक्टरीमधून सेवानिवृत्त झाले आहेत. ते पत्नीसह पर्वती भागात राहतात. सोमवारी रात्री आठच्या सुमारास त्यांच्या पत्नीच्या पोटात दुखू लागते. त्यामुळे त्यांना एरंडवण्यातील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करायचे होते. त्यांनी पत्नीला रिक्षाने रुग्णालयात पाठवून दिले. त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांनी ओळखीच्या व्यक्तीकडून कसेबसे १० हजार रुपये मिळवले. ते रुग्णालयात पोचले असता डॉक्टरांनी उपचार सुरू केले होते. त्यामुळे त्यांना पैसे भरण्याचा निरोप आला. काउंटरवर जाताच पैशांची बॅग हरवल्याचे लक्षात आले. भरपावसात त्यांना घामच फुटला. काय करावे ते कळेना, शेवटी ते ज्या रस्त्याने रुग्णालयात आले, त्याच रस्त्याने जात बॅगचा शोध सुरू केला. काही अंतर जाताच त्यांना एकाचा फोन आला. 'दत्तवाडी पोलिस ठाण्यातून पोलिस नाईक कर्मचारी नवनाथ भोसले बोलत आहे. तुमची बॅग सापडली असून, पोलिस ठाण्यातून ती घेऊन जा', असा निरोप आला.

हे शब्द ऐकताच संत यांना सुखद धक्का बसला. ते त्वरित दत्तवाडी पोलिस ठाण्यात गेले. त्यांनी बॅग घेतली. त्यात १० हजार रुपये, बँक पासबुक, एटीएम कार्ड जसेच्या तसे मिळाल्याने त्यांनी पोलिसांचे आभार मानले, असे वरिष्ठ पोलिस निरीक्षक देविदास घेवारे यांनी सांगितले.

# दामिनी पथकामुळे मिळाला पोटचा गोळा

## हरवलेल्या मुलीची आई रंजना शिंदे यांची भावना

अशोक बालगुडे

**पुणे :** मायलेकराची ताटातूट झाली, की आईच्या जिवाची घालमेल सुरू होते. ओक्साबोक्सी रडत त्याचा शोध घेण्यासाठी तिचा जीव तीळतीळ तुटतो. अशा एका हरवलेलल्या दहा वर्षांच्या मुलीला शोधण्यासाठी रडवेल्या चेहऱ्याने तिच्या आईची भटकंती सुरू झाली. तिच्या आईच्या मदतीला दामिनी पथक धावून आले. आणि सोनालीचा शोध घेऊन तिची आई रंजनाकडे सुखरूप सुपूर्द केले. मायलेकीची भेट होताच दोघींच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहू लागल्या, ते आनंदाश्रू होते.



पुणे : दामिनी पथकाने चिमुकलीला आईच्या स्वाधीन केले.

दामिनी पथकातील स्वाती रणसिंग यांनी सांगितले की, रंजना प्रकाश शिंदे (वय ३०, रा. अजिंक्य भैरवनाथ मित्रमंडळ, शेलार चाळ, कात्रज) ही महिला स्वारगेट येथे रडताना दिसली. तिची चौकशी करून रणसिंग यांनी परिस्थिती जाणून घेतली. तेव्हा रंजनाची मुलगी सोनाली करमाळा येथे मामाकडे शिक्षणासाठी असल्याचे समजले. शनिवारी (दि. १३) रोजी सोनाली शाळेत गेली होती, ती परत आली नाही. मामाने तिची शोधाशोध केली. मात्र, ती सापडली नाही, दरम्यान, मामाच्या शेजारच्या व्यक्तीने सांगितले की, मला सोनाली करमाळा एस.टी. स्टँडवर दिसली, त्या वेळी तिने आईकडे जाणार असल्याचे सांगितले होते.

दरम्यान, रणसिंग यांनी तातडीने सोनालीच्या तपासाची चक्रे फिरविली. स्वारगेट एसटी स्थानकप्रमुखांशी संपर्क साधून करमाळ्याहून येणारी एसटी कधी येते याची माहिती घेतली. त्या दिशेने तपास सुरू केला, करमाळ्याहून भूम-पुणे एसटी बस दोन वाजता निघते, ती पुण्यात सहाच्या सुमारास येते. मात्र, गर्दीमुळे सव्वासातच्या सुमारास आली. त्या वेळी एसटीमध्ये तपास असता केला सोनाली सापडली. तिची चौकशी केल्यावर तिने करमाळ्यावरून आल्याचे सांगितले. माझी आई सोमवारी येणार होती, मात्र मला आईकडे यायचे होते म्हणून घरातून निघून आले. त्या मुलीला एसटीतून उतरवून त्या महिलेकडे नेले. त्या वेळी दोघींही एकमेकीला बिलगल्या आणि त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. दोघींची ओळख पटल्याने मायलेकराची भेट घडवून आणल्याचे समाधान वाटत आहे, असे रणसिंग सांगितले.

दरम्यान, दामिनी पथकातील स्वाती रणसिंग यांच्यामुळेच माझ्या पोटचा गोळा सुखरूप मिळाल्याची भावना रंजना शिंदे यांनी व्यक्त केली.

**पुण्यनगरी** – दि. १३ जुलै, २०१९

# दामिनी पथकाकडून माणुसकीचे दर्शन



**पुणे :** पोलीस म्हटलं की, दरारा आलाच... पण खाकी वर्दीतही माणुसकीचा ओलवा असतो, याचा प्रत्यय नुकताच एका ६० वर्षांच्या वृद्धाला आला आहे. रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत पडलेल्या सखाराम तुकाराम बावधने रा. औंध रोड पड्याळवस्ती यांना दामिनी पथकातील वनिता जाधव व शारदा उमाळे यांनी तातडीने खासगी दवाखान्यात दाखल केल्याने वेळेत उपचार मिळाले. ही घटना औंध रस्त्यावर आज शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता घडली. सखाराम बावधने हे रस्त्यावर पडले होते. त्यांच्या तोंडातून रक्त निघत होते. बघ्यांची गर्दी जमली होती. दामिनी पथकातील जाधव व उमाळे या गस्तीवर होत्या. त्यांनी घटनास्थळाजवळ पाहिले व क्षणाचाही विलंब न लावता बावधने यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर बावधने यांच्या घरचा पत्ता शोधून त्यांच्याशी संपर्क करून प्रकाराची माहिती दिली. बावधने यांची बहीण अनिता यांनी दवाखान्यात येवून भावाची भेट घेतली. त्यानंतर बावधने बहीण भावाने महिला पोलीस कर्मचारी जाधव व उमाळे यांचे आभार मानले. पुढील उपचारासाठी बावधने यांना दुसऱ्या रुग्णालयामध्ये उपचारासाठी नेले. दामिनी पथकातील जाधव व उमाळे यांचे परिसरातील नागरिकांनी कौतुक करून अभिनंदन केले.

**पुण्यनगरी** – दि. १९ जुलै, २०१९

# दामिनी पथकामुळे मिळाला मोबाईल

**पुणे :** चतु:शृंगी परिसरामध्ये मोबाइल चोरणाऱ्या मुलीला दामिनी पथकातील महिला पोलीस वनिता जाधव हिने संशयावरून पकडले. तिच्याकडून मोबाइल जप्त करून तिला चतु:शृंगी पोलीस स्टेशनअंतर्गत पांडवनगर पोलीस चौकीमध्ये हजर केले. महेक बद्रुद्दीन शेख (रा. हेल्थ कॅम्प, पांडवनगर) असे मोबाइल चोरी केलेल्या मुलीचे नाव आहे. दामिनी पथकातील जाधव यांनी सांगितले की, पल्लवी विकास जोंजाळ (वय २१, रा. हेल्थ कॅम्प, पांडवनगर) हिचा मोबाईल ८ जुलै रोजी चोरीला गेला होता. तिने शेजारी राहणाऱ्या मुलीने चोरल्याचा संशय व्यक्त केला. त्यानुसार त्या मुलीला ताब्यात घेऊन तिच्याकडे विचारणा केली असता तिने मोबाइल चोरल्याचे कबूल केले. त्यानंतर तिच्याकडून मोबाइल हस्तगत करून तो जोजाळ हिला दिल्यानंतर तिने पोलिसांचे आभार मानले.



**पुढारी** – दि. २३ जुलै, २०१९

## गळफास घेऊ पाहणाऱ्या तरुणाचे प्राण वाचविले

**पुणेः प्रतिनिधी**

कर्वेनगर परिसरातील मावळे आळीत कौटुंबिक वादातून गळफास लावून घेत आत्महत्या करणाऱ्या ३० वर्षीय तरुणाचे प्राण वारजे माळवाडी पोलिसांनी वाचविले.

सोमवारी दुपारी पावणेदोनच्या सुमारास या तरुणाने घरगुती कारणांतून राहत्या घरी पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास लावून घेत आत्महत्येचा प्रयत्न केला असता, त्याच्या आईने त्याला गळफास घेताना खिडकीतून पाहिले होते. मात्र, त्याने दरवाजा आतून बंद केल्यामुळे तिला काहीच करता आले नाही. त्यानंतर तरुणाची आई मदतीसाठी कर्वेनगर पोलिस चौकीत धावत आली.

घटनेची माहिती मिळताच पोलिस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. एकाने तरुणाला खालून उचलून धरले तर दोघांनी त्याच्या गळ्याभोवताल आवळलेला फास सैल केला. जेव्हा तरुणाला खाली घेतले तेव्हा तो बेशुद्धावस्थेत होता. त्याला उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याचे आणि घरच्यांचे समुपदेशन करून पोलिसांनी तरुणाला नातेवाइकांच्या हवाली केले.

**पुढारी** – दि. १७ जुलै, २०१९

# कोंडून घेतलेल्या मुलास काढले बाहेर

**मार्केट यार्ड पोलिसांची कामगिरी**

**पुणे : प्रतिनिधी**

आईने कॉम्प्युटर सुरू करण्यास नकार दिल्याने स्वतःला कोंडून घेतलेल्या एका मुलाला पोलिसांनी मोठ्या कौशल्याने बाहेर काढले.

मार्केट यार्ड भागातील विद्यासागर कॉलनीत हा मुलगा आपल्या आई-वडिलांसह राहतो. आईने त्याला कॉम्प्युटर सुरू करण्यास मनाई केली; त्यामुळे हा मुलगा चिडला आणि त्याने खोलीत स्वतःला कोंडून घेतले. त्याने दरवाजा उघडावा यासाठी आईने बराच वेळ प्रयत्न केले. मात्र, तो दरवाजा उघडत नव्हता. यामुळे कुटुंबीयांनी पोलिस नियंत्रण कक्षाला फोन केला. मार्केट यार्ड पोलिस ठाण्यातील शिपाई पोटे व धालपे यांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलालाही कळवण्यात आले होते. मुलाने जिवाचे बरे-वाईट करून घेऊ नये, यासाठी पोटे व धालपे हे तिसऱ्या मजल्यावर गेले. तिसऱ्या मजल्यावरून पाइपच्या साह्याने दुसऱ्या मजल्याच्या बाल्कनीत आले. तसेच, लोखंडी जाळीचा दरवाजा तोडून मुलाला सुखरूप बाहेर काढले.

**पुढारी** – दि. १८ जुलै, २०१९

# ज्येष्ठ महिलेला सुखरूप पोहोचवले घरी

**पुणे: प्रतिनिधी**

सोशल मीडियाचे जेवढे तोटे आहेत, त्यांपैकी कितीतरी पटींनी फायदेदेखील आहेत. येरवडा पोलिसांनी हरवलेल्या साठ वर्षांच्या एका ज्येष्ठ महिलेला फेसबुकच्या मदतीने तिच्या घरी सुखरूप पोहोचवले.

मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास रिक्षाचालकाने ज्येष्ठ महिलेला जेल रोड पोलिस चौकीला आणून सोडले होते. हरवलेली महिला ही शिवाजीनगर परिसरातून त्या रिक्षात बसली होती. मात्र, ती कोठून आली, तिला कोठे जायचे होते, यासह घराचा पत्तादेखील तिला नीट सांगता येत नव्हता. शिवाय त्यांना एखाद्या नातेवाइकाचा मोबाईल क्रमांकदेखील माहीत नव्हता. त्यामुळे पोलिसांसमोर महिलेच्या घरचा पत्ता शोधण्याचे आव्हानच उभे ठाकले होते. परंतु, या वेळी पोलिस कर्मचारी नामदेव सुपे आणि किसन भारमळ यांनी त्यांना धीर देत त्यांचे नाव विचारले असता त्यांनी श्यामल दत्तात्रेय पुंडले (वय-६०) असे सांगितले. त्यानंतर नातेवाइकांच्या बाबतीत विचारल्यानंतर मुलाचे नाव महेश दत्तात्रेय पुंडले असल्याचे म्हटले. त्यानंतर पोलिसांनी महेश पुंडले नावाच्या व्यक्तीचा फेसबुकवर शोध घेतला. त्या वेळी त्यांना त्याचे अकाउंट मिळाले. त्यानुसार पोलिसांनी महेश पुंडले याचा संपर्क क्रमांक मिळवून त्यास जेल रोड पोलिस चौकीला बोलावून घेतले. सदरचा मुलगा सायंकाळी चौकीला आला.

या वेळी हरवलेली महिला ही त्याची आई असल्याचे सांगितले गेले. सहायक पोलिस निरीक्षक राहुल गिरमकर यांनी महेश पुंडले याच्याकडे चौकशी करून हरवलेली महिला ही त्याची आई असल्याची खात्री पटल्यानंतर तिला त्याच्या ताब्यात दिले. या वेळी आई सुखरूप मिळालेली पाहून त्याने येरवडा पोलिसांचे आभार मानले.

**पुढारी** – दि. ०९ जुलै, २०१९

# मेट्रोच्या कामामुळे आजीला सापडेना घर!

## तीन तास शोधमोहीम राबवून पोलिसांनी घरी पोहोचवले; घरचा पत्ता, संपर्क असलेली डायरी ज्येष्ठांकडे ठेवण्याचे आवाहन

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात महिन्यातच एखाद्या परिसराचा कायापालट होतो अन् टोलेजंग इमारती पाहायला मिळतात. आता मेट्रोच्या कामाने तर तो परिसरच बदलून जात आहे. त्याचाच प्रत्यय हिराबाई नामक ९२ वर्षीय आजीबाईंना आला अन् मेट्रोमुळे त्या आपलं घरंच विसरून गेल्या. त्यांना जायचं होतं पुलाच्या वाडीला अन् त्या पोहोचल्या प्रभात रस्त्यावर. गोंधळलेल्या आजीबाईंना पोलिसांनी आधार देत नातेवाइकांकडे तिला पोहोचवले.



शहरात पालिकेकडून स्मार्ट सिटी अन् मेट्रोची कामे सुरू आहेत. त्यातही मेट्रोच्या मोठमोठ्या पुलांमुळे परिसर नवीन माणसांना ओळखताच येत नाही. असंच काहीसं या हिराबाई यांच्या बाबतीत घडलं. हिराबाई गेल्या आठवड्यात (दि. ४) नातेवाइकांना भेटण्यासाठी म्हणून सकाळी पायी चालत पुलाची वाडी येथे येत होत्या; परंतु या ठिकाणी आल्यानंतर त्यांना आपण दुसरीकडेच आलो असल्याचे जाणवले. यामुळे त्या परत चालत चालत थेट प्रभात रस्त्यावर आल्या. या वेळी येथील नागरिकांना आजी वाट चुकल्याचे लक्षात आले. मग, त्यांनी एका रिक्षाचालकाला थांबवले. तसेच, त्याला डेक्कन पोलिस ठाण्यात नेण्यास सांगितले. रिक्षाचालकाने आजींना पोलिस ठाण्यात आणले. पोलिसांनी त्यांना नाव, पत्ता व इतर माहिती विचारली. पण, आजीबाई गोंधळलेल्या अवस्थेत होत्या. त्यांना पत्ता सांगता येत नव्हता. पोलिसांनी त्यांचे छायाचित्र व्हॉट्सअॅपद्वारे सर्वत्र पाठविले आणि त्यांच्या नातेवाइकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांच्याबाबत काहीच माहिती मिळेना. आजी चालत आल्याने त्या याच परिसरातील असण्याची शक्यता वर्तवण्यात आली. या वेळी कर्मचारी पवार व वैद्य यांनी रिक्षानेच त्यांना वस्त्यांमध्ये शोध घेण्यास सुरुवात केली. या वेळी खिलारेवाडीत गेल्यानंतर एका घरोघरी वृत्तपत्र टाकणाऱ्या मुलाने त्या आजींना ओळखले आणि त्यांची माहिती दिली. त्यानंतर आजींना त्यांच्या घरी नेण्यात आले. या वेळी त्यांचा ७० वर्षांचा मुलगा आईचा शोध घेत होता. आईला पाहून त्यानेही सुटकेचा श्वास सोडला. साधारण तीन तास पोलिसांनी शोध मोहीम राबवून या आजीबाईंना सुखरूप त्यांच्या घरी सोडले. दरम्यान, घरातील वृद्ध व ज्येष्ठांबरोबर नेहमी पत्ता तसेच मोबाइल क्रमांक असणारा कागद द्यावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.